**कृषी अधिकारी (जिल्हा परिषद) गट-ब (कनिष्ठ) (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांची कर्तव्य व जबाबदारी यांची कार्यसूची**

---

१. विशेष घटक योजना, आदिवासी उपयोजना, मिनी माडा योजना राबविण्याबाबत कार्यवाही करणे.
२. आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी शेतकऱ्यांसाठी योजना राबविणे (ओ. टी. एस. पी. योजना ).
३. रासायनिक खते गुणनियंत्रण संबंधीचे कामे करणे.
४. रासायनिक खते नमुने काढणे.
५. रासायनिक खते अप्रमाणित नमुने बाबत योग्य ती कार्यवाही करणे ( जसे याबाबतची न्यायालयीन प्रकरणे /विक्री बंदी आदेश/ नोटिस बजाविणे इत्यादि ).
६. रासायनिक खते विक्री केंद्रास भेटी देऊन योग्य ती तपासणी करणे व मासिक पुरवठा/ विक्री अहवाल तयार करणे.
७. किटकनाशक औषधे गुण नियंत्रण संबंधीची कामे करणे तसेच किटकनाशकांचे नमुने काढणे
८. अप्रमाणित किटकनाशकांबाबत योग्य ती कार्यवाही करणे.
९. किटकनाशके विक्री केंद्रास भेटी देऊन योग्य ती तपासणी करणे व किटकनाशक औषधे पुरवठा/ विक्री अहवाल तयार करणे.
१०. बी-बियाणे गुण नियंत्रण संबंधीचे कामे करणे तसेच नमुने काढणे.
११. अप्रमाणित बी-बियाणा संदर्भातील नेमून दिलेली (जसे - अप्रमाणित बियाणे विक्री बंदी आदेश/ त्यासंबंधीची न्यायालयीन प्रकरणे) कामे करणे.
१२. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या संबंधातील विकास कामे करणे.
१३. कृषी विभागाकडील पत्रव्यवहार सांभाळणे.
१४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्याच्या अनुषंगाने लॉटरीमध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांची कागदपत्रे ऑनलाईन पडताळणी करणे, अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करून घेणे, पात्र लाभार्थ्यांचे स्थळ पहाणी (मोका तपासणी) करणे, मंजुरीनुसार लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश/ पुर्वसंमती आदेश बजावणे, सिंचन विहीर कामांचे रेखांकन करणे,सिंचन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती व इनवले बोअर कामाचे मोजमाप करणे, मोजमापानुसार मोजमाप पुस्तीकेमध्ये नोंदी घेणे, ऑनलाईन देयके जिल्हा परिषद स्तरावर सादर करणे. पुर्वसंमती आदेशानुसार पंपसंच/ सोलरपंप /वीज जोडणी/ शेततळे अस्तरीकरण मोका तपासणी करणे, ऑनलाईन देयके जिल्हा परिषद स्तरावर सादर करणे.
१५. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील / क्षेत्रांतर्गत) राबविण्याच्या अनुषंगाने लॉटरीमध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांची कागदपत्रे ऑनलाईन पडताळणी करणे, अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करून घेणे, पात्र लाभार्थ्यांचे स्थळ पहाणी (मोका तपासणी) करणे, मंजुरीनुसार लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश/ पुर्वसंमती आदेश बजावणे, सिंचन विहीर कामांचे रेखांकन करणे,सिंचन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती व इनवले बोअर कामाचे मोजमाप करणे, मोजमापानुसार मोजमाप पुस्तीकेमध्ये नोंदी घेणे, ऑनलाईन देयके जिल्हा परिषद स्तरावर सादर करणे. पुर्वसंमती आदेशानुसार पंपसंच/ पाईपलाईन/ सोलरपंप/वीज जोडणी/ शेततळे अस्तरीकरण मोका तपासणी करणे, ऑनलाईन देयके जिल्हा परिषद स्तरावर सादर करणे.
१६. राष्ट्रीय कृषी विकास योजना (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती) राबविण्याच्या अनुषंगाने लॉटरीमध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांची कागदपत्रे ऑनलाईन पडताळणी करणे, अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करून घेणे, पात्र लाभार्थ्यांचे स्थळ पहाणी (मोका तपासणी) करणे, मंजुरीनुसार लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश

बजावणे, सिंचन विहीर कामांचे रेखांकन करणे,सिंचन विहीर कामाचे मोजमाप करणे, मोजमापानुसार मोजमाप पुस्तीकेमध्ये नोंदी घेणे, ऑनलाईन देयके जिल्हा परिषद स्तरावर सादर करणे.

१७. खरीप व रब्बी हंगामाच्या सुरूवातीस निविष्ठांचा पुरवठा सुरळीत होण्याच्या अनुषंगाने निविष्ठा पुरवठाधारकांची आढावा बैठक आयोजीत करणे व निविष्ठांचा पुरवठा सुरळीत होण्याच्या अनुषंगाने सनियंत्रण करणे.

१८. रासायनिक खते गुणनियंत्रण संबंधीचे कामे करणे. संगणकीय प्रणालीवरून रासायनिक खताचा सुरळीत पणे खताचा पुरवठा होत असल्याबाबत सनियंत्रण ठेवणे.

१९. युरीया खत विक्री झालेल्या जिल्हयातील टॉप-२० शेतकऱ्यांची खत खरेदीबाबत चौकशी करून जिल्हा स्तरावर अहवाल सादर करणे.

२०. बियाणे, खते व किटकनाशक या निविष्ठांच्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारींबाबत तालुका स्तरीय कृषी निविष्ठा तक्रार निवारण समितीचे सचिव म्हणून कामकाज पार पाडणे.

२१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कृषी विषयक कामांना तांत्रिक मंजूरी प्रदान करणे, कामांवर सनियंत्रण ठेवणे व पुर्णत्वाचे दाखले निर्गमीत करणे.

२२. पीक कापणी प्रयोगांवर पर्यवेक्षकीय सनियंत्रण ठेवणे.

२३. लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध करून देणे व लेखापरिक्षणातील आक्षेपांची पुर्तता करणे.

२४. पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणाऱ्या कृषी विषयक सर्व योजनांचा आढावा घेणे. पंचायत समिती कृषी विभागाकडील कार्यालय प्रमुख या नात्याने विस्तार अधिकारी (कृषी ) यांचेवर सनियंत्रण ठेवून . विविध योजनांची अंमलबजावणी करणे.

२५. नित्कृष्ट दर्जाचे कृषी निविदाबाबत फौजदारी गुन्हा दाखल करणे.

२६. सुक्ष्म सिंचन योजनेत शेतकरी / लाभार्थींना पुरक अनुदानाची रक्कम अदा करणे.

२७. पिक कर्जासाठी पतमर्यादा निश्चित करणेस जिल्हा मध्यवर्ती बँकेस शिफारस करणे.

२८. क्रॉपसॅप प्रकल्पाच्या मार्गदर्शक जिल्हा परिषदेकडील कृषी अधिकारी यांचेमार्फत प्रकल्पांतर्गत पिकांचे रँडम सर्वेक्षण करणे. सदर पिकांवरील कीड रोगांची प्रत्यक्ष निरिक्षणे घेऊन ती मोबाईल ॲपद्वारे संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन संकेतस्थळावर भरणे.

२९. ज्या ठिकाणी कीड रोगांचा प्रार्दुभाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ तसेच त्यावर गेलेला आहे त्या ठिकाणी क्षेत्रीय भेटी देऊन त्याची खातरजमा करणे तसेच त्या ठिकाणची निरीक्षणे व तेथे कीड नियंत्रणा करिता केलेल्या उपाय योजनांचे तपशील मोबाईल ॲपद्वारे नोंदवणे.

३०. कृषी अधिकारी यांनी अधिनस्त अधिकारी यांचेमार्फत केलेल्या कार्याचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करणे.

३१. राज्याच्या कृषी विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) अंतर्गत "तालुका तंत्रज्ञान चमुमध्ये सदस्य म्हणून काम करणे".

३२. राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सयंत्र उभारणीच्या कामांची तपासणी करणे व सनियंत्रण करणे.

३३. कृषी उत्पादन वाढीसंदर्भात शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.

३४. विविध कृषी पुरस्कार व पीक स्पर्धाबाबत कार्यवाही करणे.

३५. उपरोक्त तसेच त्या व्यतिरिक्त वेळोवेळी सोपविलेली इतर कामे पार पाडणे.